नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ९ Issue - 9 | वार सोमवार दि. २६ मे २०२५ Blow- Monday Date 26 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात पावसाचे आगमन; शेतीपिकांना फटका

## १२ दिवस अगोदरच मान्सूनचे आगमन; पावसाचा हाहा:कार, कोकणात दापोली-खेड रस्ता बंद; पुण्यातही थैमान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात १२ दिवसांपूर्वीच मान्सूनचे आगमन झाले आहे. गोव्यातून सिंधुदुर्गामध्ये पावसाने हजेरी लावली आहे. महाराष्ट्राच्या दक्षिणेकडे गोव्याजवळ अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने किनारपट्टीलगतच्या भागात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार बहुतेक भागांत पाऊस पडला आहे. मात्र या पावसाचा शेतीपिकांना मोठा फटका बसला आहे.



कोकण हा किनारपट्टीलगतचा भाग असल्याने येथे नेहमीच जोरदार पाऊस बरसतो. यंदा मान्सून लवकर दाखल झालाय, धुवाधार पाऊस बरसत असल्याने जनजीवन ठप्प झाले आहे. तसेच कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांना मोठ आर्थिक नुकसान झालं आहे. त्याचबरोबर पर्यटनाच्या शेवटच्या टप्प्यातील मोठा हंगाम पावसाच्या सावटाखाली आहे. तर मच्छीमार बांधवांनाही समुद्रातील बोटी लवकरच किनाऱ्यावर घ्याव्या लागल्या आहेत, ज्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दापोली खेड रस्त्यावरील फुरस जवळच्या एका बायपासची मोरी वाहून गेली आहे. तर दस्तुरीजवळ असलेल्या एका पुलावर पाणीच पाणी झाले आहे. परिणामी दापोली खेड मार्गावरची वाहतूक थांबवली आहे. कोकणात अलीकडे येणारी वादळं, अवेळी पाऊस यामुळे कोकणावर निसर्गाचा प्रकोप होत असल्याचे दिसते.

पुण्यातील इंदापूर आणि दौंड तालुक्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. शहरातही पावसाची रिमझिम सुरु आहे. परिणामी दौंड तालुक्यामधील छोटे पूल पाण्याखाली गेले आहेत. रस्त्यांना नद्यांचे रुप आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. जनजीवन ठप्प आहे. पुणे-सोलापूर महामार्गांवरील वाहतूक ठप्प आहे. तर भिगवणमध्ये पावसाच्या संततधारेमुळे ट्रॅक्टर वाहून गेला आहे. तर भिगवण बसस्थानकात पाणीच पाणी झाल्याचे चित्र आहे.

पुणे सोलापूर महामार्गावरील स्वामी चिंचोली याठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. रस्ता पाण्याखाली गेला आहे. पावसाच्या हाहाकाराने महामार्गावरील सर्व्हिस रोडवरील एक इन्होवा वाहून गेली आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. पण महामार्गावर ९ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. यासोबतच पुण्याहून भोरमार्गे महाड-कोकणाला वरंध घाटामध्ये संततधार पावसामुळे मार्गावर चिखलाचे साम्राज्य झाले आहे.

पालघर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाची संततधार सुरु आहे. पावसाने आजही पहाटेपासून हजेरी लावली आहे. पावसाचे रिमझिम कायम असून परिणामी उन्हाळी भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर जिल्ह्यात आतापर्यंत जवळपास ५५ ते ६९ कोटींच्या आसपास वीटभट्टीचे आर्थिक नुकसान झाले आहे.

साताऱ्यातही अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याला हवामान खात्याने पुढील चार दिवस ऑरेंज अलर्ट दिला आहे. कोयना धरण क्षेत्राच पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे या क्षेत्रातील सर्व बंधारे ओव्हरफ्लो होत आहेत. कोयना, कृष्णा नदीसह सर्व नद्यांच्या पाणीपातळीत भर पडत आहे. तर सोलापूरात माळशिरस तालुक्याला पावसाने झोडपले आहे. तालुक्यातील ओढे-नाले ओसंडून वाहत आहेत. यामध्ये रेड या गावातील बंधारा ओव्हरफ्लो झालाय, ज्यामुळे वाहतुकीचा पूल पाण्याखाली गेला आहे.

# अनावश्यक आणि वादग्रस्त विधाने करणे टाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर' मोहीमेच्या संदर्भात अनावश्यक आणि वादग्रस्त विधाने करणे टाळा, अशा कानपिचक्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रविवारी भाजप नेत्यांना दिल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. केंद्रातील सत्तारूढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे(एनडीए) मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या रविवारी दिल्लीत झालेल्या बैठकीत मोदी यांनी स्वपक्षीय नेत्यांना, प्रत्येक मुद्यावर बोलणे आवश्यक नाही, असा सल्ला जाहीरपणे दिला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करणाऱ्या सशस्त्र दलांच्या शौर्याचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धाडसी नेतृत्वाचे कौतुक करणारा ठराव मांडला. तो टाळ्यांच्या कडकडाटात मंजूर झाला. जातीनिहाय जनगणनेचे समर्थन व कौतुक करणारा ठरावही यावेळी मंजूर करण्यात आला.



मध्य प्रदेशचे मंत्री विजय शाह आणि हरियाणाचे भाजप खासदार रामचंद्र जांगडा यांनी 'ऑपरेशन सिंदूर' मोहीमेवरून महिलांबाबत केलेल्या वादग्रस्त विधानांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी एनडीए बैठकीच्या व्यासपीठावरून स्वपक्षीय नेत्यांना दिलेला ताजा सल्ला महत्त्वाचा मानला जातो आहे. या दोघांच्याही वक्तव्यांचे देशभर संतप्त पडसाद उमटले आहेत. विजय शाह यांच्या वाचाळपणाची दखल तर सर्वोच्च न्यायालयानेही घेतली आहे. यामुळे वाणीचा संयम पाळा आणि प्रत्येक वेळी, प्रत्येक मुद्यावर बोलण्याचे टाळा. सावधगिरीने बोला, हा सल्ला मोदींनी जाहीरपणे भाजप नेत्यांना जाहीरपणे दिला, असे भाजप सूत्रांचे म्हणणे आहे.

दरम्यान, जातीनिहाय जनगणना हे प्रत्येक क्षेत्रातील उपेक्षित आणि मागासलेल्या लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या त्यांच्या सरकारच्या मॉडेलच्या दिशेने महत्वाचे पाऊल असल्याचे मोदी म्हणाले. ऑपरेशन सिंदूरचे यश हे देशाने स्वावलंबी होण्याच्या दिशेने केलेल्या कामगिरीची पुष्टी आहे, ज्यामध्ये स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाची अचूकता देखील जगाने पाहिली आहे, असेही नरेंद्र मोदी म्हणाले.

दिल्लीतील अशोका हॉटेलमध्ये झालेल्या या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि भाजपाध्यक्ष जे पी नड्डा तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह २० मुख्यमंत्री आणि शिंदे तसेच अजित पवार यांच्यासह १८ उपमुख्यमंत्री उपस्थित होते. 'ऑपरेशन सिंदूर', जातीनिहाय जनगणना, मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाचा पहिला वर्धापन दिन आणि सुशासनाचे मुद्दे बैठकीच्या अजेंड्यावर होते.

**पंतप्रधान मोदींच्या भाजप नेत्यांना कानपिचक्या**

या परिषदेत एनडीए शासित राज्य सरकारांनी स्वीकारलेल्या सर्वोत्तम पद्धतींवर अनेक मुख्यमंत्र्यांनी सादरीकरणे केली. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना सुरवातीला श्रद्धांजली वाहण्यात आली. जो हमसे टकराएगा, वो मिट्टी में मिल जाएगा, ही फक्त एक म्हण नाही तर सत्य आहे हे आम्ही सिद्ध केले आहे, असे सांगून शिंदे म्हणाले की 'ऑपरेशन सिंदूर'मुळे भारतीयांचा आत्मविश्वास वाढला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी नेहमीच सशस्त्र दलांना पाठिंबा दिला आहे आणि 'ऑपरेशन सिंदूर' ने दहशतवाद्यांना आणि त्यांच्या प्रायोजकांना योग्य उत्तर दिले आहे. यामुळे सामान्य भारतीयांमध्ये आत्मविश्वास आणि अभिमानाची एक नवीन भावना निर्माण केली आहे. देशातील १४० कोटी लोकांना पंतप्रधानांचा अभिमान आहे. तुमच्यासारखे धाडसी, शूर आणि निस्वार्थी देशभक्त पंतप्रधान आपल्याला मिळाले हे देशवासीयांचे भाग्य आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

भारताच्या सार्वभौमत्वाला आणि भारतीयांच्या सुरक्षेला इतर सर्व गोष्टींपेक्षा महत्वाचे स्थान देण्याची केंद्रातील एनडीए सरकारची अढळ वचनबद्धता ऑपरेशन सिंदूर मोहीमेतून अधोरेखित होते असे सांगून शिंदे म्हणाले की कोणत्याही दहशतवादी हल्ल्याला भारत यापुढे जशास तसे उत्तर देईल आणि ते भारताच्या अटींवर केले जाईल. भारत कधीही आण्विक ब्लॅकमेल स्वीकारणार नाही. भारत दहशतवाद्यांना आणि त्यांना पुरस्कृत करणाऱ्या (पान २ वर...)

# 'ऑपरेशन सिंदूर' लष्करी मोहीम नाही, तर बदलत्या भारताचे चित्र ; मन की बात मध्ये पंतप्रधानानी व्यक्त केली भावना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : भारतीय सैन्यदलांनी नुकतेच राबविलेले 'ऑपरेशन सिंदूर' ही केवळ एक लष्करी मोहीम नाही, तर ते बदलत्या भारताचे चित्र आहे. असे चित्र, जे जागतिक स्तरावर आपल्या देशाच्या दृढनिश्चयाचे, धैर्याचे, वाढत्या शक्तीचे प्रतिबिंब असलेल्या बदलत्या भारताचे चित्रण करते. या चित्राने संपूर्ण देशाला देशभक्तीच्या भावनांनी भारून टाकले आहे, तिरंग्यात रंगवले आहे, अशी भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी व्यक्त केली. पंतप्रधान मोदी 'मन की बात' या आकाशवाणी कार्यक्रमाच्या १२२ व्या भागात बोलत होते. दहशतवादाविरुद्ध एकत्र आल्याबद्दल देशवासीयांचे कौतुक करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, दहशतवाद संपवायचाच, हा आज प्रत्येक भारतीयाचा संकल्प आहे. आज संपूर्ण देश दहशतवादाविरुद्ध एक झाला आहे, संतापाने भरलेला आहे आणि दृढनिश्चयी आहे की आपल्याला दहशतवाद संपवायचा आहे. मित्रांनो, 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान आपल्या सैन्याने दाखवलेल्या शौर्यामुळे प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटला आहे. ज्या अचूकतेने आपल्या सैन्याने सीमेपलीकडे दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले आहेत ते आश्चर्यकारक आहे , असं नरेंद्र मोदी म्हणाले.



तिरंगा यात्रेचा उल्लेख करताना मोदी यांनी संबोधित केलं. देशातील अनेक शहरे, गावे आणि लहान शहरांमध्ये तिरंगा यात्रा काढल्या गेल्या. देशाच्या सैन्याला सलाम करण्यासाठी हजारो लोक हातात तिरंगा घेऊन बाहेर पडले. अनेक शहरांमध्ये, मोठ्या संख्येने तरुण नागरी संरक्षण स्वयंसेवक बनण्यासाठी एकत्र आले. सोशल मीडियावर कविता लिहिल्या जात होत्या, संकल्पगीते गायली जात होती. लहान मुले अशी चित्रे काढत होती ज्यात मोठे संदेश लपलेले होते. ऑपरेशन सिंदूरने जगभरातील दहशतवादाविरुद्धच्या लढाईला नवा आत्मविश्वास आणि उत्साह दिला आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

आपल्या ताज्या राजस्थान दौऱ्यावेळी बिकानेरमध्ये लहान मुलांसोबत झालेल्या भेटीचाही पंतप्रधान मोदींनी खास उल्लेख केला. ते म्हणाले की, तीन दिवसांपूर्वी मी बिकानेरला गेलो तेव्हा तिथल्या मुलांनी मला असेच एक अविस्मरणीय चित्र भेट दिले. ऑपरेशन सिंदूरचा देशातील लोकांवर इतका प्रभाव पडला आहे की अनेक कुटुंबांनी तो त्यांच्या जीवनाचा एक भाग बनवला आहे. बिहारमधील कटिहार, उत्तर प्रदेशातील कुशीनगर आणि इतर अनेक शहरांमध्ये त्या काळात जन्मलेल्या मुलांचे नाव सिंदूर ठेवण्यात आले, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं.

**दौंडमध्ये घरं पाण्याखाली; बारामतीत मुसळधार पाऊस, इंदापुरातही पावसाचा हाहाकार**

**राज्यातील ६ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट**

# पाऊस वैरी बनून कोसळतोय, सिन्नरमध्ये शिवशाही बसवर स्लॅब कोसळला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा हाहा:कार बघायला मिळतोय. पुण्यात दौंड, बारामती इथे तर तुफान पाऊस पजतोय. बारामतीत ढगफुटीसदृश्य पाऊस पडल्याची माहिती मिळत आहे. यामुळे तीन इमारती खचल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. तर दौंडमधील एका गावात अनेक घरे हे पाण्याखाली गेल्याची माहिती मिळत आहे. पुण्यात दररोज पाऊस पडतोय. मान्सूनचं आगमन होण्यापूर्वी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हाहा:कार माजवला आहे. नाशिकच्या सिन्नर बस स्थानकावर तर धक्कादायक घटना घडली आहे. इथे शिवशाही बसवर बस स्थानकाचा स्लॅब कोसळला आहे. या घटनेचे दृश्य अंगावर काटा आणणारे आहेत. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप आलेली नाही. तर तळकोकणात मान्सून दाखल झाल्याची देखील माहिती मिळत आहे.

नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी आज मुसळधार पाऊस पडला. एकट्या नाशिक शहरात आज ३०.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सिन्नर, कळवण, निफाड आणि नांदगाव तालुक्यात प्रचंड पाऊस पडला आहे. सिन्नर तालुक्यात तर ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने सिन्नर बस स्थानकाचा स्लॅब तिथे उभ्या असलेल्या शिवशाही बसवर कोसळल्याची माहिती मिळत आहे. तिथे एक खाजगी चारचाकी गाडी देखील उभी होती. त्यावरही हा स्लॅब कोसळला. यावेळी शिवशाही बसमधील प्रवाशांना आपातकालीन खिडकीतून बाहेर काढलं. सुदैवाने सर्व प्रवाशी सुखरुप असल्याची माहिती आहे. सध्या घटनास्थळी मलबा बाजूला करण्याचं काम सुरु आहे.



**दौंडमध्ये गाडी वाहून गेली**

पुण्याच्या दौंड तालुक्यात पावसाचं आक्राळविक्राळ रुप बघायला मिळालं. गेल्या चार दिवसांपासून दौंड तालुक्यात पावसाचा जोर सुरू आहे. त्यामुळे पुणे-सोलापूर महामार्गावरील स्वामी चिंचोली या गावात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. पावसाच्या हाहा:काराने पुणे-सोलापूर महामार्गावरील एक इनोव्हा कार वाहून गेली. सुदैवाने यामध्ये कोणती जीवितहानी झाली नाही. मात्र पुणे-सोलापूर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्याने वाहतूक ठप्प झालीय. याशिवाय स्वामी चिंचोली गावात अनेक घरं पाण्याखाली गेल्याची माहिती आता मिळत आहे.

**बारामतीत मुसळधार पाऊस**

पुण्याच्या बारामती तालुक्याला देखील पावसाने झोडपलं आहे. बारामतीमधील लिमटेक येथे निळ्या डाव्या कालव्याला भगदाड पडलं आहे. कालव्याचं पाणी शेतात आणि घरांमध्ये शिरलं आहे. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर एनडीआरएफची टीम बारामती आणि दौंड तालुक्यात दाखल झाली आहे. बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीदेखील नागरिकांना गरज असेल तरच घराबाहेर पडा, असं आवाहन केलं आहे.

**इंदापूरमध्येही हाहा:कार**

पुण्यातील इंदापूर तालुक्यातही जोरदार पाऊस पडतोय. भिगवन-बारामती रस्त्यावर असणाऱ्या ओढ्याला पूर आला आहे. पुराचं पाणी रस्त्यात आणि घरांमध्ये शिरलं आहे. या भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे अनेक गावांचा संर्पक तुटला आहे. तसेच भिगवणमध्ये देखील अनेक घरांममध्ये पाणी शिरलं.

**राज्यातील ६ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट**

राज्यभरात सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. ही परिस्थिती उद्या देखील असण्याची शक्यता आहे. राज्यातील ६ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

सातारा जिल्ह्यातही पावसाने धुमाकूळ घातला आहे. कोळकी-फलटण रस्त्यावरील ओढ्याला पूर आला आहे. या पुरात एक दुचाकीस्वार थोडक्यात बचावला आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. याशिवाय बीड, अहमदनगरमध्येदेखील जोरदार पाऊस पडला आहे. बीडच्या आष्टी तालुक्यातील कडा गावात तर आष्टी-जामखेड रस्त्यावर कडा गावातील मातीचा पूल वाहून गेला आहे. तर सोलापूरच्या माळशिरस तालुक्यातही जोरदार पावसाने बॅटिंग केली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

सोमवार दि. २६ मे २०२५ 

## संपादकीय....

### कानपिचक्या

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर' मोहीमेच्या संदर्भात अनावश्यक आणि वादग्रस्त विधाने करणे टाळा, अशा कानपिचक्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रविवारी भाजप नेत्यांना दिल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. केंद्रातील सत्तारूढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे(एनडीए) मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या रविवारी दिल्लीत झालेल्या बैठकीत मोदी यांनी स्वपक्षीय नेत्यांना, प्रत्येक मुद्यावर बोलणे आवश्यक नाही, असा सल्ला जाहीरपणे दिला. मध्य प्रदेशचे मंत्री विजय शाह आणि हरियाणाचे भाजप खासदार रामचंद्र जांगडा यांनी 'ऑपरेशन सिंदूर' मोहीमेवरून महिलांबाबत केलेल्या वादग्रस्त विधानांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी एनडीए बैठकीच्या व्यासपीठावरून स्वपक्षीय नेत्यांना दिलेला ताजा सल्ला महत्त्वाचा मानला जातो आहे. या दोघांच्याही वक्तव्यांचे देशभर संतप्त पडसाद उमटले आहेत. विजय शाह यांच्या वाचाळपणाची दखल तर सर्वोच्च न्यायालयानेही घेतली आहे. यामुळे वाणीचा संयम पाळा आणि प्रत्येक वेळी, प्रत्येक मुद्यावर बोलण्याचे टाळा. सावधगिरीने बोला, हा सल्ला मोदींनी जाहीरपणे भाजप नेत्यांना जाहीरपणे दिला, असे भाजप सूत्रांचे म्हणणे आहे. ऑपरेशन सिंदूरचे यश हे देशाने स्वावलंबी होण्याच्या दिशेने केलेल्या कामगिरीची पुष्टी आहे, ज्यामध्ये स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाची अचूकता देखील जगाने पाहिली आहे, असेही नरेंद्र मोदी म्हणाले. 'ऑपरेशन सिंदूर', जातीनिहाय जनगणना, मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाचा पहिला वर्धापन दिन आणि सुशासनाचे मुद्दे बैठकीच्या अजेंड्यावर होते.

## दुचाकीवर ठेवलेली सिगारेटची पिशवी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) :इलेक्ट्रिक दुचाकीवर ठेवलेली २३ हजार ८०० रुपये किमतीचे विविध कंपनीचे सिगरेट असलेली पिशवी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.८ मे रोजी सकाळी पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास दास पान टपरी येथे घडली.याप्रकरणी श्रीनिवास नरसप्पा मैले (वय-५०,रा.दाजी पेठ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.


पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जमादार हे करीत आहेत.

## अनावश्यक आणि वादग्रस्त विधाने करणे टाळा

(पान १ वरून..) सरकारांना वेगळे करणार नाही. ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या शांतता प्रवासात अडथळा आणणाऱ्यांना योग्य उत्तर आहे. भारताचे सार्वभौमत्व आणि नागरिकांची सुरक्षा सर्वात श्रेष्ठ , ही एनडीए सरकारची वचनबद्धता आहे. एनडीएचे नेते दहशतवादाविरुद्ध भारताच्या वचनबद्धतेचा संदेश जगभर पसरवतील, असेही शिंदे यांनी सांगितले.

जातीय जनगणनेवर चर्चा करताना नड्डा म्हणाले की, आम्ही जातीचे राजकारण करत नाही तर वंचित, पीडित, शोषित आणि वगळलेल्या दलितांना मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे काम करतो. ही समाजाची गरज आहे. या बैठकीत नक्षलवाद्यांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेवरही आणि नक्षलवाद कायमचा संपविण्याच्या संदर्भातील रणनीतीवर अमित शहा यांनी चर्चा केली. छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांनी आपण नक्षलवादाशी कसा लढा दिला आहे आणि आपल्याला कसे यश मिळत आहे याबाबत सादरीकरण केल्याचेही नड्डा म्हणाले.

# अनंताचा विवेकशील विद्रोह




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आंबेडकरवाद मानवी जीवनातील बहुसंख्य प्रश्नांची उत्तरे देतो. आंबेडकरवाद जगातील सर्वाधिक दुःखी विषमता ग्रस्त माणसांच्या मुक्तीचा विचार मांडतो. जगातील वर्णवाद, वंशवाद, गरीब-श्रीमंत भेद मिटवून सवांना समानतेच्या वाटेवर आणणारा विचार आहे. तथागत बुद्धानंतर या जगाची पुनर्रचना करणारा विचार आहे आंबेडकरवाद जगातील बहुसंख्या माणसांच्या हिताचा, सुखाचा विचार करणारा आहे. ते माझे मी त्यांचा हा एकच ओघ वाहते ठेवणारा विचार आहे.

आपण सर्व माणसं आहोत. माणसांच्या पोटी जन्माला आले. जन्म-मृत्यू आपल्या हाती नाही. कुशल कर्म आपल्या हाती आहे. स्वतः जगायचे, दुसर्यांनाही जगू द्यायचे, त्यासाठी आपल्याकडे जे जे अतिरिक्त असेल ते दुसर्यांचे जगणे सुखाचे करण्यासाठी दान करावे, अतिरिक्त कोणतेही धन असो ते वितरीत करण्यात जीवनाचे सार्थक आहे. जीवन जगण्यासाठी जेवढे गरजेपुरते तेवढे ठेवून अतिरिक्त साधन संपत्ती दुसर्याच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी देवून टाकावे, हे माणूस म्हणून आपले खरे कर्म-कर्तृत्व आहे. जसे रिकामे आलो तसे रिकामेच जाणार आहोत. शेवटी तुमचे कुशल कर्म तुम्हाला जिवंत ठेवते. असे एक जग, नवी समाज रचना भारतीय संविधान आधारे निर्माण करावयचा विचार तत्वज्ञानात आहे. तीच या देशाची खरी संस्कृती आहे. त्यासाठी बुद्धाने राजगृह सोडून ४५ वर्षे चरक भिक्खवे चारिकम करीत भवतु सबब मंगलमसाठी काया, वाचा, मन विचार, धन सर्वकाही लोकसेवेसाठी खर्ची घातले. त्यांच्या विचाराच्या तत्वज्ञानाच्या वाटेवर बाबासाहेब पाऊल टाकले. या बुद्ध-प्रबुद्ध समतेच्या रथाचे आपण ही वाहक झाले पाहिजे. वामन कर्डक यांनी वाट फुलेची सोडून, आंबेडकरांना सोडून तुला चालताच येयाचे नाही, त्यांना सोबतीला घेवून जीवन जगणार्या माणसाच्या जीवनाचे सार्थक होणार आहे. अंतिमत भुकेल्याची भूक आणि तान्हेल्याची तहान भागवणारी भारतीय संस्कृताची शिकवण आहे. ती शिकवन बुद्ध ते प्रबुद्धा पर्यंत चालत आलेली आहे, ते यापुढे चालु ठेवली पाहिजे. हे बुद्ध-प्रबुद्धाचे तत्वज्ञान सर्वांने प्रबुद्ध बुद्ध होण्यासाठीच आहे. तुम्हीही बुद्ध-प्रबुद्ध होऊ शकता. त्यासाठी बुद्ध-प्रबुद्धाप्रमाणे कुशल कर्म करून सदाचारी जीवन जगले पाहिजे. तेवढेच आपल्या हातात आहे. अन्यकाही खरे नाही. आज आहात. उद्या नाही, जग अनित्य आहे. परिवर्तनशील आहे. या जगात अंतिम असे काहीच नाही आलोत शुन्यातून शुन्यातच जावावे लागेल. या विद्रोहा अनंता पर्यंत अनंताने कशासाठी करायचा आहे. या विद्रोहा मागे जागृत विवेक आहे. हा विवेकशील विद्रोह आहे. या विद्रोहात द्रोह नाही माणसाने थोडसं माणसासारखे वागावे, जगावे, इतरांनाही माणूस म्हणूनच वागवावे माणूस म्हणून जगावे, मरावे, भीमामुळे माणूस माणसात आला. त्या माणसांच्या माहोलात परिघात बसून सांगेन चार गोष्टी युक्तीच्या, माणुसकीच्या.. सांगणे माझ्या हाती आहे, वागणे तुमच्या हाती आहे. त्यासाठी हा अनंताचा विद्रोह आहे. हा विद्रोह कुणावरतरी कुणीतरी अन्याय-जुलूम केला म्हणूनच जन्माला आल. जन्मताच माणूस व्रिदोही नसतो. तो करूणामय असतो, ही करूणामय वात्सल्याची भावना अनंताच्या विद्रोही संकल्पनेमागे आहे. विद्रोह हे एक सौंदर्यमुल्य आहे. मानवाचे जगणे अधिकाधिक सुंदर करण्यासाठीच दिवसेंदिवस पाऊले टाकत बुद्ध-प्रबुद्धाच्या विचार-अंगीकारून जीवन जगण्यातच जीवनाचे सार्थक आहे.

बुद्धाने रोहिणी नदीच्या पाण्यावरून गृहत्याग केला. हा एक त्या लोकांच्या वर्तनाविरूद्धचा विद्रोहच होता. तर बाबासाहेबांचा विद्रोह प्रसंगानुरूप ही व्यवस्था नीट करण्यासाठी जन्माला आला. तो अत्यंत प्रगल्भ, विवेकशील आहे. बुद्धा-सोबत प्रबुद्ध घेवूनच जगावे लागते. इच्छा आणि गरज हा तथागत बुद्धाचा सिद्धांत अंगीकारून चालणारे प्रबुद्ध हवे आहेत. त्यासाठीच कलावंताचे साहित्यिकांचे बोलणे, लिहिणे, आहे. ते विचार प्रगटीकरण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानात देते, बुद्ध तत्वज्ञान देते, जे हे विचाराचे स्वातंत्र्य देतात, समजून घेतात. जिथे विचाराचे अदान-प्रधान होते. तिथे विवेकाला उत्कृष्ठ दृष्टी प्राप्त होते. त्या दृष्टीला ही सृष्टी उत्तमच दिसते. बुद्ध-प्रबुद्ध विचाराची दृष्टी सृष्टी उत्तम दिसते. ते तुमच्या माझ्याही दृष्टीला दिसले पाहिजे. हे विचाराचे स्वातंत्र्य मिळते तो विचार जग स्विकारते, बुद्ध- प्रबुद्धाचे विचार कलसुसंगत लोकांना पटताहेत, म्हणून जगात सर्वाधिक भाष्य या बुद्ध-प्रबुद्ध विचारावर होताहेत त्यांचाच एक भाग विद्रोह अनंताचा. आंबेडकरवादी वाङ्मयाचे मुख्य प्रयोजन भारतीय समाजात परिवर्तन घडवून समताधिष्ठित, विषमतारहित एक एक नवी समाजरचना भारतीय संविधान अधारे निर्माण करणारा विचार आहे. आंबेडकरवादी वाङ्मयनिर्मितीला अनुभवाचे अधिष्ठान आहे. आणि अनुभवातून जन्माला आलेले वङ्ःमय हे सर्वश्रेष्ठ असते. अनुभवातून शहाणपण येते आणि वाचण्यातून ज्ञानपण येते. ते माणसाला माणूस मिळवून देते 'हेच हवे आहे. भाकर हवीच थोडीशी प्रतिष्ठाही हवी आहे. आंबेडकरवादी वङ्ःमय जीवनवादी असून जीवनातून कलेचा जन्म होतो. मानवाच्या मुलभूत गरजा भागवल्याशिवाय कलेचा जन्मच होत नाही. कलेची उपासना करता येते. अगोदर माणसाला माणसात आणणे, या प्रगत समाजात आणण्यासाठीच असंख्य वैचारिक, ग्रंथ, कथा, कादंबर्या नाटके, कविता अनेक अंगाने आंबेडरवाद समजात रूजविण्यासाठी त्या विचाराच्या वाटेनी जाण्यातच मानवाचे हित सुख आहे. याची लोकांना जाणीव करून देण्यासाठी वङ्ःमय प्रबोधनाचे, समाज जागृतीचे साधन-शस्त्र म्हणून पाहिजे जाते. मानवाने निर्माण केलेली साधन सामुग्री, शस्त्र, शास्त्र, ज्ञान, धन आदी मानवाच्या सुखासाठी, कल्याणासाठीच आहे. इच्छा आणि गरजानुसार साधन संपत्तीचा, ज्ञानाचा, शास्त्राचा, धनाचा उपयोग केला पाहिजे.

प्रारंभी ज्ञान शस्त्राचा उपयोग जपून केला पाहिजे. ज्ञान हे जगातील सर्वश्रेष्ठ शस्त्र आहे. शब्दानेच पेरतात घरे-दारे आणि देश सुद्ध शब्दच विझवतात आग पेटलेल्या घराघराची शब्दानेच माणस जवळ आली. वामन निंबाळकराप्रमाणे शब्दाचे धन सर्वश्रेष्ठ असल्याचे संत तुकोबाने ही सांगितले आहे. तेच ज्ञान जगात सर्वश्रेष्ठ असलेली शक्ती आहे. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना दाखवून दिले आहे. म्हणून कवी अनंत जाधव म्हणतात.

शब्द सुसंवाद, साधण्याचे साधन
शब्दांना हवे सु विचाराचे बंधन
शब्दांनी माणसं तोडली
जोडली जतन शक्य आहे योग्य वापरावे (२०)
शब्द थोडसे वापरा जपून
शब्द वादाळ, ठरते कारणम (३५)

चहुअंगाने धार असते. पिढ्या मारता आणि जगवताही येतात. म्हणून कवी अनंत जाधव हे महात्मा फुले यांच्या अखंडाचा दाखला देताना म्हणतात.

'विद्याविना वदले फुले, मती गेली वित्त गेले.
अर्थहीन जीवन झाले, एवढे अनर्थ विद्येने केले (१११)

शाळा शिकून मिळवलेल्या ज्ञानशास्त्राने पिढ्यापिढ्या माणसं इथे मारली गेली. आणि त्याच ज्ञान शस्त्राने बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षे गुलामीतून माणसांना बाहेर काढून माणंस केले, माणसात आणले. अनंत माझ्या जीवनाचे सोने झाले ते खरे आहे. बाबासाहेब परिसाने सराफाने आमचे जीवनाचे सोने केले. ते आमच्या देव चेहादेव त्याहीपेक्षा सर्वश्रेष्ठ आहेत. खरा देव माणसात, माय-बापात आहे. (२२) म्हणून परमेश्वर शोधण्यात कित्येक पिढ्या गेल्या, परमेश्वराची भक्ती, आराधना करणार्या माणसाचे वर्तन पशुवत दिसते. माणसे शिकले, बंगले बांधले, कॉलनी झाल्या. तिथे ओपन पेस मध्ये मंदीरे उभारले. मंदीराला कुल्पे लावली गेली, देवाच्या दरबारात राहणारे, देवाची पुजा करणारी माणसं आली का माणसातले पशुत्व वाढले? म्हणून कवी अनंता म्हणतात...

कुठे कुठे शोधू तुला
सांग देवा राया
तुझा शोध घेणार्यांचा
जन्म गेला वाया (पृ.क्र.४७)

माणसं माणसातून उठली, पशु झाले. तिथे देव दगडात कुठून येणार आहे. देव या महापुरूषामध्ये असल्याचे धडे वर्गात शिकवले गेले पाहिजेत.

देश घडवतील असाच गुरजी
शाहु-आंबेडकर- गांधी-फुल्यांची
कथा तुलना ऐकवा (पु.क्र.६६)
आणि आज ते शिकवले गेले, जात आहे म्हणून बाबासाहेब अनुयायांनी
पुस्तके महाग केली. दिशाभूमी, चैत्यभूमी येथे कोटी-कोटी रूपयाचे
पुस्तके विकले जात आहेत, ते वाचले जात आहेत, कारण
वाच अनंता
पुस्तकात भीम आहे
ज्ञान देणार्या
ग्रंथात भीम आहे
सुवर्ण इतिहासाच्या
पानात भीम आहे (५)

जगात सर्वश्रेष्ठ ज्ञानीवंत वाचल्याने मानवी जीवनातील आधार नष्ठ होवून प्रकाशात होताहेत. आंबेडकर विचारातच मानव मुक्तीचा विचार आहे, त्या पथाने जाण्यातच जीवनाला अर्थ येतो म्हणून...

भीम पथाने आज भारता हा
समाज पुढे जात आहे
तुझ्या शौर्याचे अमोल कर्माचे
गीत सुखाने गात आहे (पृ.क्र.१००)

कारण या विश्वात बुद्ध-प्रबुद्ध विचार शाश्वत होत जातो आहे. कारण बुद्ध नीतीत/कुशल कर्मात/ बुद्ध शोधावा/ अनंता विज्ञानात/ बुद्ध ज्ञानाच्या पुस्तकात आहे.(पृ.क्र.९०) ज्ञान हेच सर्वश्रेष्ठ शस्त्र असल्यानेच बुद्ध- प्रबुद्धांना जग स्विकारत आहे. बाबासाहेबांना जगाने ज्ञानाचे सिबॉल मानले आहे. माणसाने माणूस म्हणून वागावे, वागवावे, माणसात आले पाहिजे. माणसातले पशुत्व घालवून टाकण्याचे सामर्थ्य बुद्ध-प्रबुद्धाच्या विचारात आहे.

बुद्ध- प्रबुद्धांच्या अनुयाने ज्ञान घेवून शहाणे झाले. त्यांनी इतराने शहाणे करून या प्रगत समाज प्रवाहात आणण्यासाठी, पहावे थोडेसे मागे वळुन असे कवी म्हणतात.

पुढे गेलास काही कोस चालुन
पहावे थोडेसे मागे तू वळून
तुझे भाऊ ते राहिले मागे
त्यांना सांगत जावे थोडे घेवून (१०६)

ही अपेक्षा शिकले-सवरलेल्यांकडून, साहित्यिकांकडून बाबासाहेबांनी व्यक्त केली होती. याची कवीनी आठवन करून दिलेली आहे.

बुद्ध-प्रबुद्धांच्या अनुयायाने मागे राहिलेल्या माणसांना माणूस म्हणून आपल्या सोबत घेवून चालले, जीवन जगले पाहिजे. मानवी जीवनात प्रश्न एवढे प्रश्न आहेत साडेवायला आयुष्य कमी पडेल तरी प्रत्येकांच्या हाताला काम पोटाला भाकर अन्न, वस्त्र आणि राहायला निवारा असावा. मानवाच्या मुलभूत गरजा भागल्या पाहिजे. म्हणून बुद्ध- प्रबुद्धाचा निवाडा हा अतिरिक्त साधन संपत्तीचा उपयोग गरजवंतांना देवून जगवले पाहिजे. जगा आणि जगू द्या यासाठी गरज पेक्षा जास्त आहे ते गरजवंतांना दिले पाहिजे. म्हणून कवी म्हणतात...

अपेक्षा पेक्षा जास्त नको
अन्न वस्त्र निवारा दे
दीन दुबळ्या अनाथांना
तुझ्या मायेचा उभार दे (पृ.क्र.१०९)

ही अपेक्षा बुद्ध महात्मा फुले, महात्मा बसवेश्वर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची होती. त्यास सार्थ ठरण्याची भाषा कवीने केली आहे.

माणूस जन्म पुनःपुन्हा येणार नाही. आणि कितीही कमवले धन-दौलत-साधन संपत्ती तरी येथेच मागे ठेवून जायाचे आहे. हे अंतिम सत्य आहे म्हणून कवी म्हणतात.

जन्मा आल होता तेंव्हा
काय आणले संगे
आता धन द्रव्यामध्ये
मन तुझे दंगे
आज आहे उद्या आणखी
असेल कुणाचे (पृ.क्र.७८)
माझे माझे म्हणतो परंतु
आहे सारे व्यर्थ
कधी कळेल तुला अनंता जीवनाचा अर्थ (पृ.क्र.७८)

तेव्हा, 'काया वाचा मन-शुद्ध पवित्र ठेवून मनातले दुर्गन काढून जीवन जगावे, मानवी जीवनाचे काही खरे नाही. आज, आता, तांबाडेतोब, आहे आणि नाहीच होऊन जाते. तेव्हा माणसाने माणसासाठी जगावे, सर्वांच्या सुखाचा हिताचा कल्याणाचा, मंगलतेचा विचार आपण केला पाहिजे. तीच या भारत देशाची शिकवण आहे. या देशाची मुळ संस्कृती आहे. ती पुन्हा या देशात आली नांदली पाहिजे. आज नही तो कल जमाने बदलेगा' यावरती विश्वास ठेवून लेखन केले पाहिजे. लोकांनी तसे वर्तन करून जीवन जगले पाहिजे. अतिरिक्त कोणतीही साधन संपत्ती न बाळगता गरजवंतांना वितरीत करून त्यांचे जगणे सुखाचे करण्यात मानवी जीवनाचा अर्थ दडलेला आहे. आणि तो अर्थ बुद्ध-फुले-शाहू- आंबेडकरी विचारात गवसलेला आहे. म्हणून पिडीत दुःखीतांच्या मनात भीम आहे. 'असंख्य कोटी-कोटी जनात भीम आहे. हे भीम-युग- आंबेडकर युग म्हटले पाहिजे. जे जात-धर्म-वंश यांच्या पलीकडे जाऊन अनंताच्या विद्रोह मागचा अर्थ समजून घेतला पाहिजे. माणसांचे जे-जे- माणसं शोषण करतील, जो पर्यंत माणसं माणसांत येणार नाहीत, 'ते माझे मी त्यांचा आहे' हे घडत नाही तोपर्यंत हा अनंताचा अनंत काळ विद्रोह अनेक अंगाने चालू राहणारच आहे. तो विद्रोह विवेकशील असेल कारण बुद्ध- प्रबुद्धाची लढाई ही शस्त्राची नाही, विचाराची आहे. तो विचार अनंत जाधव घेवून निघालेत. आपणही सोबत गेले पाहिजे. असे मला वाटते.

**– प्रा.गौतम गायकवाड, अंबाजोगाई**

# वीज आणि पशुधन : संरक्षणाचे प्रभावी उपाय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राज्यात सध्या अवकाळी पावसाचे आणि वादळी वाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे आणि यामुळे वीज पडण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. मान्सूनपूर्व काळात, विशेषत: शेतीच्या कामांच्या वेळी, वीज पडण्याचा धोका अधिक असतो आणि यामुळे पशुधनाची हानी होण्याची शक्यता वाढते. भारतामध्ये महाराष्ट्रात वीज पडून मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. मराठवाडा आणि विदर्भासारख्या भागांमध्ये भौगोलिक रचना, कमी झाडी आणि हवामानातील बदलांमुळे हा धोका अधिक जाणवतो. वीज पडल्याने केवळ पशुधनच नव्हे, तर शेतकरी आणि मालमत्तेचेही मोठे नुकसान होते. जीवितहानी सुध्दा होते. त्यामुळे पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे वीजेपासून संरक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. विजेपासून पशुधनाचे संरक्षण कसे करावे तसेच करावयाच्या उपाययोजनाबाबत माहिती देणारा लेख

वीज पडण्याची कारणे :

वीज पडण्याची काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :

विद्युत भार (Electric Charge): ढगांमधील पाण्याच्या थेंबांचे आणि बर्फाच्या कणांचे घर्षण होऊन सकारात्मक आणि नकारात्मक विद्युत भार निर्माण होतो.

विद्युत क्षेत्र (Electric Field): ढग आणि जमीन यांच्यातील विद्युत भाराचे अंतर वाढल्याने एक शक्तिशाली विद्युत क्षेत्र तयार होते. जेव्हा हे क्षेत्र हवेच्या प्रतिकारापेक्षा अधिक होते, तेव्हा वीज जमिनीवर कोसळते.

तापमान आणि आर्द्रता (Temperature and Humidity): उष्ण आणि दमट हवामान ढगांची जलद निर्मिती करते, ज्यामुळे विद्युत भार लवकर वाढतो.

भौगोलिक घटक (Geographical Factors): उंच झाडे, पर्वत किंवा धातूच्या वस्तू वीज आकर्षित करू शकतात.

पशुधनाचे वीजेपासून संरक्षण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना :

पशुपालकांनी आपल्या पशुधनाला वीजेच्या धोक्यापासून वाचवण्यासाठी खालील उपाययोजनांचा अवलंब करणे गरजेचे आहे :

सुरक्षित आश्रय (Safe Shelter):

जनावरांना कधीही मोकळ्या जागेत बांधू नये.

पावसाचे वातावरण आणि विजेचा गडगडाट होत असल्यास शेतातील काम त्वरित थांबवून जनावरांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीमध्ये हलवावे.

गोठ्याचे छत आणि भिंती शक्यतो धातूच्या नसाव्यात, कारण धातू वीज आकर्षित करतात. जर धातूचे बांधकाम असेल, तर ते व्यवस्थितरित्या अर्थिंग केलेले असावे.

अचानक आलेल्या वादळात स्वतःचा बचाव (Self-Protection During Sudden Storms) :

जर तुमच्या अंगावरचे केस उभे राहत असतील किंवा त्वचेला मुंग्या येत असतील, तर तुमच्यावर वीज कोसळण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत त्वरित जमिनीवर पाय गुडघ्यात दुमडून एकमेकांना जोडावेत, त्याभोवती हातांचा विळखा घालावा आणि हनुवटी गुडघ्यावर दाबून धरावी.

जनावरांना शक्य असल्यास खाली बसवावे.

वातावरण शांत झाल्यावर त्वरित सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

अचानक गडगडाट होत असल्यास आणि जवळपास फक्त झाडेच असतील, तर झाडाच्या उंचीच्या दुप्पट अंतरावर जमिनीवर वाकून बसावे.

जनावरे पाण्यात असल्यास त्यांना त्वरित बाहेर काढावे, कारण पाणी विजेचे सुवाहक असते.

वीज सुवाहकांपासून सावधगिरी (Caution with Lightning Conductors):

गोठ्यातील लोखंडी पत्रे, वीजवाहक तारा किंवा विद्युत उपकरणांना स्पर्श करणे टाळावे.

गोठ्यातील वीज कनेक्शन आणि विद्युत अर्थिंग योग्य तसेच सुरक्षित असल्याची खात्री करावी. अर्थिंगमुळे वीज जमिनीत सुरक्षितपणे जाते आणि जनावरांना धोका टळतो.

विद्युत उपकरणांचा वापर टाळा (Avoid Electrical ppliances):

आकाशात गडद काळे ढग जमून गडगडाट होत असल्यास गोठ्यातील कोणतेही विद्युत उपकरण चालू करू नये.

पशुधनाचे गोठे, कडबाकुट्टी यंत्र आणि गोठ्यातील इतर विजेचे साहित्य योग्यरीत्या अर्थिंग केलेले असावे.

धातूच्या वस्तूंपासून दूर राहा (Stay way from Metal Objects):

जनावरांजवळ धातूच्या वस्तू (उदा. लोखंडी साधने) ठेवू नयेत.

शेतात काम करणाऱ्या व्यक्तींनी धातूच्या वस्तू जसे की कुऱ्हाड, कोयते, छत्री त्वरित दूर टाकाव्यात.

धातूची पाणीपात्रे उंच ठिकाणी किंवा मैदानातील खुल्या जागी ठेवू नयेत, कारण त्या वीज आकर्षित करू शकतात.

स्थानिक हवामानाकडे लक्ष देणे (Pay Attention to Local Weather):

हवामान खात्याच्या सूचनांचे नियमितपणे पालन करावे.

दामिनी ॲप (Damini App): भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था पुणे (IITM) आणि भारतीय हवामान विभागाने विकसित केलेले 'दामिनी वीज चेतावणी प' डाउनलोड करावे. या पच्या माध्यमातून परिसरातील हवामानाचा आणि वीज पडण्याचा अंदाज मिळतो, ज्यामुळे वेळीच सुरक्षितता बाळगता येते.

वादळी वारे किंवा वीज पडण्याची शक्यता असल्यास जनावरांना गोठ्यातच ठेवावे.

जनावरांचे व्यवस्थापन (Animal Management):

गडगडाटाने जनावरे घाबरण्याची शक्यता असते, त्यामुळे त्यांना प्रेमळ वागणूक देऊन शांत करावे.

गोठ्यात योग्य तापमान आणि आर्द्रता राखण्यासाठी पंखे किंवा फॉगरचा वापर करावा.

जनावरांना पाणी आणि खनिज मिश्रणासह संतुलित आहार द्यावा, ज्यामुळे त्यांची रोगप्रतिकारशक्ती वाढते.

तांत्रिक उपाय (Technical Measures):

गोठ्यांवर वीजरोधक यंत्रणा (लाइटनिंग अरेस्टर) बसवावी. ही यंत्रणा वीजेचा झटका जमिनीत सुरक्षितपणे पोहोचवते.

स्वयंचलित तापमान आणि आर्द्रता नियंत्रण प्रणालीचा वापर करावा.

इतर सुरक्षितता उपाय (Other Safety Measures):

झाडाखाली आश्रय टाळा: उंच झाडे वीज आकर्षित करतात. त्यामुळे वीज पडण्याचा धोका असताना झाडाखाली स्वतः आणि जनावरांना बांधू नये. पावसामुळे मृत्यू होणार नाही, पण झाडाखाली थांबल्यास धोका निर्माण होऊ शकतो.

शेतामध्ये काम करत असताना आपण आणि जनावरे विद्युत तारांपासून किमान ५० फूट अंतरावर राहावे.

बैलांना नांगरत असताना तात्काळ लोखंडी जू पासून वेगळे करावे.

आपत्कालीन उपचार (Emergency Treatment):

जर एखाद्या जनावरावर वीज पडली, तर त्वरित पशुवैद्यकीय मदत घ्यावी.

जागरूकता (Awareness):

पशुपालकांना वीज पडण्याचे धोके आणि त्यावरील बचाव उपायांबाबत माहिती द्यावी.

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी मदत (Assistance for Losses Due to Natural Disasters):

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना केंद्र आणि राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत दिली जाते.

वीज पडून जनावरांचा मृत्यू झाल्यास अल्प व अत्यल्पभूधारक आणि भूमिहीन पशुपालकांना शासनाच्या नियमांनुसार मदत मिळते. यासाठी मृत जनावराचा तलाठी यांचा पंचनामा, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे शवविच्छेदन अहवाल आणि इतर आवश्यक कागदपत्रे महसूल विभागाकडे जमा करावी लागतात.

या सर्व उपायांचे पालन करून पशुपालक त्यांच्या पशुधनाचे वीजेच्या धोक्यापासून संरक्षण करू शकतात. त्यामुळे, सतर्क राहा आणि आपल्या जनावरांची काळजी घ्या!

संकलन :
विजय राऊत, सहा. संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२


दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये; मान्सूनच्या प्रवासाची गती लवकरच कमी होणार

मुंबई : या वर्षी मान्सूनचा प्रवास वेगाने सुरु असल्यामुळे तो २५ मे रोजी दक्षिण कोकणात दाखल झाला आहे, जे सामान्य तारखेपेक्षा १० दिवस आधीच आहे. मात्र २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होणार असल्यामुळे राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील. सध्याच्या अंदाजानुसार २७ मे पासून राज्यातील हवामान हळू हळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे, आणि किमान ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम



राहणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे किमान ५ जूनपर्यंत तरी राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची आणि मान्सूनच्या पावसाची शक्यता दिसत नाही. या दरम्यान देशातील इतर भागात सुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. या वर्षी राज्यातील अनेक भागात दमदार मान्सून पूर्वीचा वादळी पाऊस पडला आहे. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सिन्नर तालुक्यात जोरदार पाऊस

## सिन्नर बसस्थानकाचा स्लॅब शिवशाही बसवर कोसळला





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी:- सिन्नर शहरासह तालुक्यात मान्सूनचे आगमन झाले असून आज मुसळधार पाऊस कोसळला आहे. या पावसाचा फटका सिन्नर बसस्थानकाला बसला आहे. तुफानी पावसामुळे सिन्नरच्या हायटेक बसस्थानकाचा काही भाग कोसळल्याची घटना घडली आहे. स्लॅबचा काही भाग शिवशाही बस वर तसेच एका खाजगी कारवर कोसळला.त्यामुळे शिवशाही बसचे नुकसान झाल्याचे समजते. बसमधील सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे . सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही .खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण बसस्थानक रिकामा करण्यात आला आहे. पावसाचे पाणी साचल्याने शहरातील रस्ते काही काळासाठी बंद झाले असून वाहतूक ठप्प झाली होती.

पावसामुळे बसस्थानकातील सदर घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु, हा भाग नेमका कशामुळे कोसळला हे अद्याप समजू शकलेले नाही.

ग्रामीण भागात देखील दमदार पाऊस बरसत असून, नद्या आणि नाल्यांना पूर आल्याचे चित्र बघायला मिळत आहे. पावसामुळे शेतीमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज आहे. सिन्नर शहरात ग्रामीण भागात मुसळधार पाऊस झाला असून त्यामुळे सरस्वती आणि देव नदीला पूर आला आहे.

### 'व्हॉईस ऑफ मीडिया' देणार प्रशिक्षण

## पत्रकारिता आणि संघटनात्मक बांधणीवर दोन दिवसीय अभ्यासपूर्ण सत्रांचे शिर्डीत आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (केतन भोज) – राज्यातील पत्रकारांच्या व्यावसायिक क्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकार संघटनेच्या वतीने दिनांक ३१ मे व १ जून २०२५ रोजी शिर्डी येथील आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बदलती पत्रकारिता आणि संघटनात्मक बांधणी या मुख्य विषयाभोवती फिरणाऱ्या या कार्यशाळेत विविध क्षेत्रातील नामवंत संपादक, अभ्यासक आणि व्यावसायिक तज्ज्ञ आपले मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यशाळेचे उद्घाटन शनिवार, ३१ मे रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगलीदास महाराज ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, ना. राधाकृष्ण विखे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे आणि आमदार अमोल खताळ हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.पहिल्या दिवशी दै. पुढारी, पुणेचे संपादक सुनील माळी हे ग्रामीण पत्रकारिता या विषयावर आपले विचार मांडतील. त्यानंतर ज्येष्ठ पत्रकार संदीप वाकचौरे आणि चपराक, पुणेचे संपादक घनश्याम पाटील हे अनुक्रमे बातमीदारी आणि साहित्य व पत्रकारितेचे बदलते स्वरूप यावर सखोल मार्गदर्शन करतील.दुसऱ्या दिवशी व्यावसायिक मानसिकता विकास तज्ज्ञ गगन महोत्रा, वजीर मीडिया हाऊसच्या संचालिका स्मिता गुणे व अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर नवले यांच्या सत्रांमध्ये महिला पत्रकारिता : मार्केटिंग एक उद्योग, समाजाची पत्रकारितेकडून अपेक्षा या विषयांवर विचारमंथन होणार आहे.

**राज्यभरातून सहभागी होणार व्हॉईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी**

VOICE OF MEDIA

या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधीसाठी मोफत सर्व रोग निदान शिबीर आणि हेल्थ कार्ड देण्यात येणार आहे. याच कार्यशाळेदरम्यान आत्मा मलिक मल्टी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि व्हॉईस ऑफ मीडिया यांच्यातील सहकार्य कराराची औपचारिक घोषणा देखील करण्यात येईल.या उपक्रमात व्हॉईस ऑफ मीडियाच्या प्रदेश अध्यक्ष अनिल मस्के, कार्याध्यक्ष अजित कुंकुलोळ, सरचिटणीस डिगंबर महाले, महिला प्रदेशाध्यक्ष रश्मी मारवाडी आणि सविता चंद्रे (ग्रामीण) यांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

## निफाड येथे मंत्री भुजबळ यांचे जल्लोषात स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड

राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी नियुक्ती झाल्यानंतर पहिल्यांदाच मंत्री छगन भुजबळ हे नाशिक दौऱ्यावर येत असून त्यांचे विविध ठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आली आहे.

यावेळी निफाड चौफुली येथेही निफाड नगरपंचायत, निफाड सोसायटी, अर्बन बँक, शिवसेना, शेतकरी संघ , आदिवासी आश्रम शाळा , आदी विविध संघटनेच्या वतीने फटाक्यांची आतिश बाजी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले , याप्रसंगी निफाड नगरपंचायत च्या नगराध्यक्षा शारदा कापसे ,उपनगराध्यक्ष अनिल कुंदे ,राजाभाऊ शेलार, तसेच शिवाजीराजे ढेपले, राजाभाऊ राठी ,देवदत्त कापसे, संपतराव व्यवहारे ,नंदकुमार कापसे, संदीप जेऊघाले, सागर निकाळे व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते,

## समाजातील विधायक कार्यामुळे तरुणांमध्ये देशभक्ती बरोबर देशाभिमान वाढते : सैदप्पा झळकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (तालुका प्रतिनिधी) : कार्यकर्त्यांनी समाजात विधायक कामे केल्यास समाजातील तरुणांमध्ये देशभक्ती व देशाभिमान निर्माण होते. अशी प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले गट) चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील सामाजिक कार्यकर्ता आझम शेख यांच्या कडून हजरत सय्यद बावाद्दिन वली यांच्या जत्रेचे संदल (गंध) औचित्य साधून भक्तांना प्रसाद वाटप कार्यक्रमात श्री सैदप्पा झळकी प्रमूख पाहुणे म्हणून मनोगत व्यक्त करतांना वरील वक्तव्य केला आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दुधनी मुस्लिम समाज अध्यक्ष जिलांनी नाकेदार हे होते.



दुधनी येथील हजरत सय्यद बावाद्दीन वली यांच्या संदल(गंध) जत्रेत दुधनी व आजु-बाजूतील गावचे हिंदु मुस्लिम चे भक्तगण भक्तिभावाने मोठ्या प्रमाणात दरवर्षी सहभाग घेतात. उपस्थित भक्तासाठी प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी आर पी आय जिल्हा उपाध्यक्ष सैदपा झळकी, मुस्लिम समाज अध्यक्ष श्री.जीलानी नाकेदार, आर पी आय दुधनी शहर अध्यक्ष श्री. गोरखनाथ दोडमनी, मुस्लिम अल्पसंख्याक अध्यक्ष श्री. मेदीमिया जिडगे, दर्गा ट्रस्ट चे अध्यक्ष मौला साब मुजावर, चिनू मणियार, मुलका मुजावर, सामाजिक कार्यकर्ता आझम भाई शेखजी, शरीफ मुजावर, शाहरुख मुल्ला, महिबुब शेखजी, राज नागणसुर, दाऊद नदाफ, अशपाक मुजावर, सहील शेखजी, समीर जिडगे, इरफान चौधरी, गैसपाक शेखजी, रजाक मुजावर, नाजीम बळूर्गी, मदार मुजावर, सलीम झळकी, यासीन मुल्ला आदि सह इतर कार्यकर्ते व भक्तगण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## खरोसा नवभारत विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव

औसा तालक्यातील खरोसा येथील २००६ बॅचच्या १० विच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा साजरा झाला ,यावेळी तब्बल १९ वर्षांनी भेटले दहावी बॅचचे विद्यार्थी ,आज खरोसा येथील नवभारत विद्यालयात दहावी २००६ बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळाव्यात प्रथमता क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेच पुजन करुन प्रतिज्ञा व राष्ट्रगीत गाउन दहावीचा वर्ग भरवण्यात आला यावेळी प्रार्थना झाल्यानंतर छडी लागे छम छम विद्या येई घम घम महनीप्रमाने प्रार्थना होताच हातावर छडीचे फटके देत विद्यार्थ्यांची हजेरी घेउन वर्ग भरवण्यात आला ,व जुन्या आठवणींना उजाळा देत २००६ चे वर्ग मित्र व वर्ग मैत्रीनींनी धम्माल करत स्नेह मेळावा साजरा केला ,यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्याध्यापक परमेश्वर स्वामी ,कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक सुर्यवंशी,माजी मुख्याध्यापक शेषेराव बिराजदार ,सहशिक्षक औरादे सर ,मल्लीकार्जुन डोके,कावरे सर,नवखंडे सर,स्नेह मेळावा आयोजक राहुल डोके,सावता क्षीरसागर,विरभद्र स्वामी ,निकीता नरवटे,उषा क्षीरसागर ,सरिता साळुंके,दिपाली तोडकर ,सुनिल देशपांडे,रेश्मा होगले ,उज्वला डोके,बालिका पांचाळ ,कल्पना भातमोडे ,किरण एकंबे,भगवान जाधव,विष्णु जावळे ,महेश डोकै .नवनाथ डोके,गणेश मुसांडे,परमेश्वर यजगर ,प्रदिप चिंचोले ,राम सोलापुरे ,सह कासले सर,गवळी सर ,घोडके सर,पाटील सर ,कोळपे सर सह माजी विद्यार्थी व नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक सेवक व खरोसा ग्रामस्थ उपस्थीत होते!



### लातूरमध्ये विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले मार्गदर्शन

### शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत आवाहन

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीसाठी शिवसैनिकांनी सज्ज राहावे


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर (प्रत्तिनिधी) अमर जाधव

महाराष्ट्रात होणाऱ्या संभाव्य स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या माध्यमातून शिवसेना उद्धव बाळासाहेव ठाकरे या पक्षाचा भगवा फडकवण्यासाठी जिल्ह्यातील तमाम शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी कामाला लागावे असा संदेश महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी लातूर येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये बोलताना दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्रामध्ये येत्या चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घ्यावा असा आदेश आल्याने सर्वच राजकीय पक्ष स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या मोर्चे बांधणीसाठी सज्ज झाले आहेत आपल्याच पक्षाचा झेंडा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सभागृहात फडकावा यासाठी संघटन बांधणीकडे लक्ष दिले जात असताना शिवसेना नेते तथा विधान परिषदेची विरोधी पक्षनेते अंबादारा दानवे यांनी लातूर जिल्हा शिवसेनेची बैठक बोलावली होती.

या बैठकीमध्ये लातूर शहर महानगरपालिकेसह, नगरपालिका नगर पंचायत व लातूर जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका अशा सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने निवडणुका



लढवाव्यात जास्तीत जास्त जागा लढवून शिवसेना संघटन बांधणी करून शिवसेनेचा भगवा प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सभागृहात फडकवावा यासाठी सर्वच शिवसेना पदाधिकाऱ्यांनी आपापल्या गावांमध्ये वार्डात प्रभागात तसेच जिल्हा परिषद गट गन पिंजून काढून बूथ रचनेपासून ते प्रभाग रचना उमेदवार निवडी पर्यंत लक्ष द्यावे आज पासूनच प्रबल अशी संघटना बांधणी करून शिवसेनेचा उमेदवार सभागृहात कसा पोहोचेल यासाठी सर्व जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख शहर प्रमुख, विभाग प्रमुख, गटप्रमुख, शाखाप्रमुख आदींनी आपापल्या भागामध्ये जाऊन स्थानिक पातळीवर बैठका घेऊन तेथील समस्या सोडवण्यासाठी होणारे प्रयत्न यावर लक्ष द्यावे जनतेच्या जोपर्यंत तुम्ही समस्या सोडवणार नाही तोपर्यंत जनता तुमच्या सोबत येणार नाही यामुळे जनतेच्या समस्यांना प्राधान्य द्यावे अशासूचना यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिवसेना बैठकीमध्ये बोलताना सांगितले.

बैठकीसाठी लातूर जिल्ह्याचे सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी महिला जिल्हा संघटक सौ जयश्रीताई उटगे, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, हरिभाऊ सगरे, डॉ. शोभाताई बेजगें, विष्णू साठे, युवा सेनेचे जिल्हा युवा अधिकारी दिनेश जावळे, तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, भागवत वंगे, मुकेश सुडे, कैलास पाटील, परमेश्वर सुर्यवंशी, शिवाजी चव्हाण, शेतकरी सेनेचे अण्णासाहेब मिरगाळे, प्रकाश हैबतपुरे, किसन समुद्रे, बसवराज मंगरूळे, अनिल स्वामी, राहुल रोडे यासह जिल्ह्यातील तमाम शिवसेना पदाधिकारी शेकडो शिवसैनिक तालुका प्रमुख उप तालुका प्रमुख शहर प्रमुख विधानसभा संघटक युवा सेना महिला आघाडी व संलग्न शाखेचे पदाधिकारी तसेच शाखाप्रमुख विभाग प्रमुख बुथ प्रमुख यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

## थोडक्यात...

### बसव प्रतिभा पुरस्कार वितरण

अक्कालकोट : सोलापूर जिल्ह्यातील ग्लोबल लिंगायत महासभेच्या वागदरी शाखेकडून १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी बसव प्रतिभा पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला जाईल, असे शाखेचे अध्यक्ष शरणप्पा मंगणे आणि सचिव शांताकुमार कोटे यांनी एका निवेदनात म्हटले आहे. रविवार, १ जून रोजी सकाळी ९.३० वाजता तालुक्यातील वागदरिया येथील शिवलिंगेश्वर सांस्कृतिक सभागृहात, श्री परमेश्वर पालखी उत्सव समितीचे अध्यक्ष राजकुमार निंबाळे यांच्या अध्यक्षतेखाली धुत्तरगाव-उस्तुरी मठाचे कोरणेश्वर महास्वामीजी यांच्या सानिध्ध्यात , आकाक्ल्कोट गट शिक्षणधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. वागदरी एसबीआय बँकेचे व्यवस्थापक कीर्तीसागर माने, जागतिक लिंगायत महासभेचे राज्य कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, जिल्हाध्यक्ष शिवानंद गोगाव, वागदरी सरपंच घोळसगवा, उप सरपंच पंकज सुतार, तंटा-तकरामुक्त गाव समितीचे अध्यक्ष लक्ष्मण सलगरे, बालरोगतज्ज्ञ डॉ. शिवर-ाज संगशेटी, मल्लिनाथ शेळके, मुख्याध्यापक अनिल देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.गावातील सॉफ्टवेअर अभियंता राजकुमार पोमाजी, तरुण व्यावसायिक संतोष हरकरे, नूतन व्यवस्थापक चन्नबसप्पा पोमाजी, सेवानिवृत्त एएसआय शिवशरण पोमाजी, बसचालक चंद्राम पोमाजी यांचा गौरव करण्यात येणार आहे.या द्वितीय वर्षाच्या कार्यक्रमाबद्दल अधिक माहितीसाठी वगादरी परीक्षा केंद्रातील विद्यार्थी ८६००२१७१८८ आणि ७३५०६८६८५३ वर संपर्क साधू शकतात, अशी विनंती उपाध्यक्ष घलय्य स्वामी यांनी केली आहे.

# १३२ महापरेषण गोगांव ते ३३/११ सब स्टेशन शिरवळ पर्यंत महावितरण ठेकेदाराकडून रोडवर अतिक्रमण

## अक्कलकोट वागदरी गोगांव रोडच्या साईड पट्टीवर नवीन खांब रोवण्याचे काम चालू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/ हणमंत घोदे

वागदरी मंडळातील शिरवळ सब स्टेशन येथून होत असलेले वीज पुरवठा वागदरी मंडळातील गावांना कमी असल्याने महावितरण कंपनी कडून नवीन सब स्टेशन १३२ केव्ही गोगांव वरून वीज पुरवठा करण्यासाठी १३२ केव्ही गोगांव ते ३३/११ शिरवळ पर्यंत नवीन खांब रोवून त्यावर तार टाकण्यात येत आहेत.

परंतु गोगांव ते शिरवळ दरम्यान रोवण्यात येत असलेले खांब अक्कलकोट वागदरी गोगांव रोड साइड असणाऱ्या साईड पट्टी वर रोवण्यात येत आहेत अक्कलकोट वागदरी हा रस्ता ५४८ इ नॅशनल हायव्हे असल्याकारणाने मोठया प्रमाणात वाहनांची वर्दळ आहे कारण हा रस्ता कर्नाटक व मराठवाड्याला जोडतो व अक्कलकोट हे शहर श्री स्वामी समर्थ महाराज यांचा पदस्पर्शाने तीर्थ क्षेत्र झाल्याने मराठवाडा व कर्नाटक मधून मोठया प्रमाणात भक्त या मार्गाचा वापर करतात त्यामुळे महावितरण कडून १३२ केव्ही गोगांव ते ३३/११ सबस्टेशन शिरवळ दरम्यान नवीन खांब रोवण्याचे काम चालू असून ते रोड साईड असणाऱ्या साईड पट्टी वर रोवण्यात येत आहेत.

**साईड पट्टीवर खांब उभा केल्यामुळे अपघात होण्याची शक्यता; राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांची या कामाकडे दुर्लक्ष**

साईड पट्टी हे वाहन मध्ये बिघाड झाल्यास अथवा गाडी पंक्चर झाल्यास थांबण्यासाठी बनवलेले असते पण महावितरण मुजोर ठेकेदार गोगांव ते शिरवळ पर्यंत खांबे साईड पट्टी रोवत आहेत भविष्यात कुठली गाडी बाजूच्या साईड पट्टी वर घेताना अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण? असे वाहतूकदार व प्रवाशांत चर्चा चालू आहे. कारण जर एखाद्या खांबाला वाहनांची धडक झाल्यास महावितरण जबाबदार घेईल का? तसेच खांब रोवण्यास नॅशनल हाइव्हे कडून परवाना भेटले आहे का ? मुजोर ठेकेदार कडून मजोरी करून राजकीय वरदहस्त वापरून खांब रोवत आहे का ? या कामावर महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची लक्ष आहे का तसेच नॅशनल हाईव्हे अधिकाऱ्यांना माहिती आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



**अक्कलकोट वागदरी हा रस्ता ५४८ इ नॅशनल हायव्हे असून सदर रस्त्याची चौपधरी काम लवकरच सुरुवात होणार आहे त्यामुळे दोन्ही बाजूस रस्ता वाढ होणार असून त्यामुळे सध्या चालू असलेले काम बेकायदेशीर अतिक्रमण करून चालू आहे याबाबत त्यांना विचारल्यावर ठेकेदार हे शासकीय काम आहे आम्हाला कोणी अडवू शकत नाही असे धमकी लोकांना देत आहे ज्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये पोल लावण्यात आले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळणे बाबत व रस्त्यावरील पोल त्वरित काढण्याबाबत जिलाधिकारी व कार्यकारी अभियंता सा. बा. वि सोलापूर यांना लेखी तक्रार देण्यात येणार आहे.**
**– कमलाकर सोनकांबळे ( उपसरपंच गोगांव)**



# निफाड तालुक्यातील सहकार नेते रमेशचंद्र घुगे यांचा भाजपात प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/निफाड

निफाड तालुक्यातील सहकार क्षेत्रातील रमेशचंद्र घुगे यांनी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षप्रवेश झाला.



या कार्यक्रमाला प्रदेश सरचिटणीस अँड. माधवी नाईक, आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, माध्यम विभागप्रमुख नवनाथ बन जिल्हाध्याक्ष शंकर वाघ आदी उपस्थित होते.यावेळी ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वांचे स्वागत केले. भाजपची ध्येयधोरणे ही जनसामान्यांच्या कल्याणासाठी असल्याने, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कणखर नेतृत्वामुळे विकसित भारत व विकसित महाराष्ट्र घडणार असल्याचा विश्वास असल्याने घुगे यांनी भाजपात प्रवेश केला आहे.भाग्यश्री सहकारी पतसंस्था, ज्ञानदीप बहुउद्देशीय विकास सेवा संस्था, शेतीमाल खरेदी विक्री व प्रक्रिया सहकारी संस्था, नाशिक जिल्हा कांदा बटाटा उत्पादक संघ, खादी व ग्रामोद्योग उत्पादक संघ, तसेच नाशिक जिल्हा सहकारी पतसंस्थेचे संचालक अशा विविध संस्थांच्या माध्यमातून सहकार चळवळ बळकट करणारे घुगे यांच्या भाजपा प्रवेशामुळे भाजपाला अधिक ताकद मिळणार आहे, असा विश्वास ना

बावनकुळे यांनी व्यक्त केला, तसेच पक्षात सर्वांचा योग्य तो सन्मान राखला जाईल, अशी ग्वाही चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता जनतेच्या हितासाठी भाजपामध्ये प्रवेश करीत असल्याचे रमेशचंद्र घुगे यांनी सांगितले.. त्यांच्यासोबत पक्षात प्रवेश केलेल्यांमध्ये स्वर्गीय त्रंबकराव घुगे पतसंस्था व्हा. चेअरमन खंडेराव चव्हाण, पिंपळगाव बाजार समिती माजी संचालक माणिकराव शिंदे, निफाड पंचायत समिती माजी सदस्य बंडू आहेर, ओढे सरपंच संजय कातकाडे,नाशिक कांदा बटाटा संघ संचालक रामदास सानप, धान्य भुसार असोसिएशन संचालक दीपक कदम, निफाड तालुका सुवर्णकार समाज अध्यक्ष राजाभाऊ नागरे, अँड. चेतन घुगे यांनी पक्ष प्रवेश केला... याप्रसंगी भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

# पिस्टल हलगर्जी पणाने हाताळल्याने त्यातून सुटलेल्या गोळीने एक जण जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

इंदापूर तालुक्यातील जगदाळे फार्म हाऊसवर ही घटना घडलेली आहे. सुधीर रावसाहेब महाडिक-देशमुख असं जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथील रहिवासी आहेत. घटने नंतर इंदापूर पोलिसांनी आता चौघांविरोधात विरोधात गुन्हा दाखल केला आहे.१) प्रदिप नानासाहेब जगदाळे राहणार सराटी सराटी तालुका इंदापूर २) सुधीर रावसाहेब महाडिक देशमुख राहणार टेंभुर्णी तालुका माढा ३) विजय शिवाजी पवार राहणार बेंबळे तालुका माढा आणि राजकुमार दिलीपराव पाटील राहणार अकोले टेंभुर्णी तालुका माढा अशी गुन्हा दाखल झालेली यांची नावे आहेत.


पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काल शनिवारी २४ मे रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास इंदापूर तालुक्यातील सराटी येथील जगदाळे फार्महाउस वर सुधीर महाडिक देशमुख यांचा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्ताने हे सर्वजण एकत्र आले होते. याच वेळी राजकुमार दिलीपराव पाटील यांच्याकडील परवानाधारक पिस्टल सुधीर महाडिक देशमुख हातळत होते. आणि याच वेळी या पिस्टल मधून गोळी सुटली ती थेट सुधीर महाडिक यांच्या छातीच्या उजव्या बाजूला लागली यामध्ये ते जखमी झाले. त्यांच्यावर सध्या पुण्यात खा-जगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरून बंदुकीची रिकामी पितळी पुंगळी,एक हुक्का कप पाईप, एक पत्यांचा सेट ताब्यात घेतला असून पोलिसांनी फरशी वरती पडलेले रक्ताचे नमुने देखील घेत-लेले आहेत. इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर राऊत अधिक तपास करीत आहेत

# जनशक्ती संघटना महाराष्ट्र राज्याच्या युवक प्रदेशाध्यक्षपदी गणेश भानवसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जनशक्ती संघटना महाराष्ट्र राज्याच्या युवक प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी वांगी नंबर २ येथील युवा कार्यकर्ते गणेश अभिमान भानवसे यांना देण्यात आले असून या निवडीचे पत्र संस्थापक अध्यक्ष अतुल खूपसे पाटील यांनी दिले.

शेतकऱ्यांच्या, विद्यार्थ्यांच्या पोलिसांच्या, पाण्याच्या अशा वेगवेगळ्या प्रश्नांवर जनशक्ती च्या माध्यमातून अतुल खूपसे पाटील उत्स संघटनेचे



नेहमीच आवाज उठवला आहे. धडक बेधडक आंदोलन हे म्हणून त्यांची ओळख असून संघटना वाढीसाठी आणि महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रश्नावर लढण्यासाठी ते पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत याच पार्श्वभूमीवर युवक प्रदेशाध्यक्ष पदाची महत्त्वाची जबाबदारी आणि महत्त्वाची धुरा गणेश भानवसे यांच्यावर दिले आहे.

नियुक्तीनंतर बोलताना गणेश भावाशी म्हणाले की, संघटनेच्या ध्येयधोरणानुसार सर्वसामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी व त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी, त्यांना संघटनेच्या माध्यमातून सहकार्य करण्यासाठी तसेच समाजातील शेतकरी शैक्षणिक, शेतकरी, कला ,क्रीडा, सांस्कृतिक, निराधार ,आंध, अपंग उद्योग व्यवसायिकांचे प्रश्न घेऊन सत्ताधारी असो शासन किंवा प्रशासन असो या व्यवस्थेची दोन हात करण्यासाठी जनशक्तीच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याची त्यांनी सांगितले

## वीट भट्टी व्यावसायला लघु उद्योगाचा दर्जा देण्याची व्यवसायीकांची मागणी

# अवकाळी पावसामुळे भिवंडीतील वीटभट्टी व्यवसायिकांचे प्रचंड नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

अवकाळी पावसाने ग्रामीण भागात शेतीपूरक असलेल्या वीटभट्टी व्यवसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भाजण्याच्या तयारीत असलेल्या व तयार करून ठेवलेल्या कच्च्या मातीच्या विटा अवकाळी पा-वसाने विरघळल्याने वीटभट्टी मालक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आ-हेत. शासकीय नियम अटींचे पालन करून व रॉयल्टी भरून ही शासन वीट भट्टी व्यवसायिकांकडे दुर्लक्ष करत असल्याने वीट भट्टी व्यवसायिकांना आर्थिक नुकसान भरपाई द्यावी व वीट भट्टी व्यवसायिकाला लघु उद्योगाचा दर्जा मिळावा अशी मागणी व्यावसायिकांकडून केली जात आहे.



शेती व्यवसायाला पूरक व्यवसाय म्हणून भिवंडीतील ग्रामीण भागातील शेतकरी आपल्या शेतात वीटभट्टीचा व्यवसाय करतात. ग्रामीण भागात टेंभवली,जुनांदूरखी,लाखीवली,पालिवली, धामणे,चिंबीपाडा,पाये, पायगाव, खारबाव, मालोडी,खार्डी, तसेच कोनगाव ,पिंपळास , सुपेगाव , अंबाडी आदी गावांमध्ये शेतकरी मोठ्या प्रमाणात मातीच्या विटांचा वीटभट्टी व्यवसाय करतात.

आधी सिमेंट विटा तसेच सिफॉरेक्स विटांनी मातीच्या विटांचा व्यवसाय डबघाईला आला असून त्यानंतर आता अवकाळी पावसामुळे वीटभट्टी मालकांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असल्याने वीटभट्टी मालकांवर व या व्यावसायावर अवलंबून असलेल्या आदिवासी मजुरांवर देखील आर्थिक संकट ओढवले आहे.

ग्रामीण भागातील अनेक वीटभट्टी व्यावसायिक सावकाराकडून व्याजी पैसे घेऊन तसेच दागिने गहाण ठेऊन वीटभट्टी व्यवसायाची सुरुवात करतात.मे महिना व जून महिन्याचे काही दिवस जो पर्यंत पाऊस नसतो तोपर्यंत वीटभट्टी व्यावसायिक विटा बनवत असतात.मात्र यावेळी संपूर्ण मे महिन्यात सुरुवातीपासून अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने वीटभट्टी व्यावसायिकांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून व्यावसायिक आर्थिक संकटात सापडला असल्याने अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे शासनाने करावे व वीटभट्टी व्यावसायिकांना भरपाई म्हणून आर्थिक मदत करावी अशी मागणी वीटभट्टी व्यावसायिकांकडून केली जात आहे.

अवकाळी पावसामुळे ठाणे,पालघर,रायगड जिल्ह्यासह राज्यातील अनेक ठिकाणी विटभट्टी व्यावसायिकांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून व्यवसायिकांसह विटभट्टी रोजगारांवर उपासमारीची वेळ आली आहे.आम्ही दरवर्षी शासनाची रॉयल्टी भरून सुध्दा आम्हाला आवकाली पावसामुळे नुकसान झालेल्या मालाची नुकसान भरपाई मिळत नाही,हे दुर्दैवी असून शासनाने वीटभट्टी नुकसान भरपाईचे पंचनामे करून व्यवसायिकांना आर्थिक मदत करावी व वीटभट्टी व्यावसायास लघु उद्योजक दर्जा मिळावा यासाठी आम्ही मुख्यमंत्र्यांसह जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले आहे अशी प्रतिक्रिया कोकण विभागीय विटभट्टी चालक मालक संघटनेचे अध्यक्ष कुंदन पाटील यांनी दिली आहे.

# भारतीय स्टेट बँकेचे चेअरमन श्री शेट्टी यांनी घेतले श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : भारतीय स्टेट बँकेचे चेअरमन सी एस शेट्टी यांनी आज श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन घेतले.




यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे विभाग प्रमुख संजय कोकीळ यांनी चेअरमन शेट्टी यांचा श्रींची मुर्ती व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी, युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक, भारतीय स्टेट बँकचे अरविंद कुमार, श्रीराम सिंग, सतिश कुमार, पंकज बर्नवाल, आनंदकुमार पाटकर तसेच पंढरपूर शाखेचे मुख्य प्रबंधक आश्रय दीक्षित व प्रबंधक राहुल गाडेकर उपस्थित होते.

**बँकेच्या सीएसआर फंडातून ३० लाख रूपयांची देणगी**

याप्रसंगी भारतीय स्टेट बँकेचे चेअरमन सी एस शेट्टी यांनी मंदिर समितीस बँकेच्या सीएसआर फंडातून १२५ केव्हीए क्षमतेचा सोलार प्लॉन्ट उभारणेसाठी ३० लाख रूपयांच्या देणगीचा धनादेश मंदिर समितीस दिला असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.